# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २३/०८/२०२२ (मंगळवार)**

**(दुपार)**

---

### जबरी संभोग

**पो.स्टे. जलालखेडा** :— दिनांक ०१/०१/२०११ ते २५/०७/२२ चे ०१.०० चे सुमारास वय २१ वर्षीय पीडित/फिर्यादी हिच्या सोबत आरोपी नामे— धनपाल अजाबराव कांबळे, वय ४८ वर्ष, रा. बरडपवनी त. नरखेड याने लैंगीक अत्याचार केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४,३७६(२)(एफ) ३७६(३) भादवी सहकलम ४,६,८,१० बालकाचे लैंगीक अपराधा पासुन संरक्षण अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री चौधरी मो.नं. ८९७५७५५९६९ हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. भिवापुर** :— अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील तास कॉलनी भिवापुर येथे दिनांक २२/०८/२२ चे ०५. ३० वा. सुमारास एमएच— ३३/ए— ६२९२ क्रमांकाची क्रेटा कारचा चालक आरोपी नामे— सुनिल मुरलिधरराव बटुवार वय ५५ वर्षे रा. गडचिरोली हा आपले मुलीला एयरपोर्ट नागपुर येथे सोडुन आपली पत्नी व मुला सोबत गडचिरोली येथे परत जात असतांना अचानक मौजा तास कॉलनी येथे कार चालकाला अचानक डुलकी आल्याने डोळा लागला त्यादरम्यान आरोपीने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने कार उलटली. या अपघातात कार मध्ये बसलेली त्याची पत्नी जखमी झाली व मुलगा कृष्णा सुनिल बटुवार(मृतक), वय १६ वर्ष याचे डोक्याला जबर मार लागल्याने त्याचे मरणास व स्वत: जखमी होण्यास आरोपी कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी पोलिस हवालदार भगवानदास यादव पो.स्टे भिवापुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि शरद भस्मे मो.क्र.९७६४९४६८०८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील रोहणा मोड येथे दिनांक १८/०८/२२ चे १२.०० वा. ते दिनांक २२/०८/२२ चे १२.२० वा. सुमारास छेदीलाल गोपीराम केशकर(मृतक), वय ७९ वर्ष, रा. रोहना मोड, घर क्र. ३१३ पोस्टे वलनी माईन, ता. सावनेर जि. नागपूर हे दिनांक १८/०८/२०२२ रोजी दुपारी १२.०० वा. सुमारास पायदळ घरून निघाले असता थोडयाच अंतरावर रोहणा मोड येथे पोस्टे खापरखेडा चे हद्दीत त्यांचे पाठीमागून येणारे दुचाकी वाहन क्र. एमएच— ४०/एजी— ४५२५ चे चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे चालवून त्यांना धडक दिली. या अपघातात छेदीलाल केशकर हे खाली पडल्याने ते जखमी झाले. त्यांना उपचारासाठी प्रथम वलनी डब्लु सी एल हॉस्पीटल येथे नेले व नंतर मेडीट्रिना हॉस्पीटल रामदासपेठ नागपूर येथे नेले असता उपचारादरम्यान दिनांक २०/०८/२०२२ चे ०८.४७ वा. मरण पावले. पोस्टे सिताबर्डी येथे डेथ एम एल सी वरून खबर देणाऱ्याचे बयान घेवून पोस्टे सिताबर्डी येथे मर्ग क्र ००/२०२२ अन्वये दाखल केला. मृतकाचे इंकवेस्ट

पंचनामा व पी एम कार्यवाही मेयो हॉस्पीटल नागपूर येथे करण्यात आले. नमुद घटनास्थळ हे पोस्टे. खापरखेडा हद्दीतील असून मर्ग डायरी संपुर्ण कागदपत्रासह वर्ग करण्यात आले. पोलीस स्टेशन सिताबर्डी येथुन मर्ग क्र ००/२०२२ कलम १७४ जाफौ चे कागदपत्र पोहवा वंजारीयांनी पोलीस स्टेशन खापरखेडा येथे आणल्याने सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— प्रेमलाल छेदालाल केसकर, वय ४८ वर्ष, रा. ३१३ वलनी माईन रोहणा ता. सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास श्रेणी पोउपनि श्री नामदेव धांडे मो.नं. ९७६४४०१२४६ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. अरोली** — दिनांक २२/०८/२०२२ चे ०३.०० वा. ते ०५.०० वा. चे सुमारास पो.स्टे. अरोली हद्दीत फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्षीय हीला आरोपी नामे— अक्षय अनिल पाटील, वय २५ वर्ष, रा. आंधळगाव ता. मोहाडी, जि. भंडारा याने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री जोशी मो.क्र. ७८७५९६६६७६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**